# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
# राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-२०१६- अंतिम निकाल
# घोषणा

आयोगातर्फे **राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-२०१६** चा अंतिम निकाल दिनांक १६ मार्च, २०१७ रोजी जाहीर केला असून, राज्यभरातील एकूण १३० राजपत्रित अधिका-यांच्या पदांसाठी यशस्वी उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये गट-अ चे ७१ उमेदवार व गट-ब चे ५९ अशा एकूण १३० उमेदवारांचा समावेश आहे. प्रस्तुत परीक्षेत नाशिक जिल्हयातील श्री. अहिरे भूषण अशोक (PN002343) हे राज्यातून प्रथम आले असून ते अनुसूचित जाती या वर्गवारीतील आहेत. श्री. अहिरे हे अभियांत्रिकी शाखेतील पदवीधर असून त्यांची उपजिल्हाधिकारी, गट-अ पदाकरिता निवड झाली आहे.

२. प्रस्तुत परीक्षेत सातारा जिल्हयातील श्रीमती पाटील पूनम संभाजी (PN001422) हया महिलांमधून राज्यात प्रथम आल्या असून त्या अराखीव वर्गवारीतील आहेत. श्रीमती पाटील हया अभियांत्रिकी शाखेतील पदवीधर असून त्यांची पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त, गट-अ या पदाकरिता निवड झाली आहे.

३. राज्य सेवा (पूर्व) परीक्षा-२०१६ दिनांक १० एप्रिल, २०१६ रोजी मुंबईसह राज्यातील ३७ जिल्हा केंद्रावर घेण्यात आली होती. सदर परीक्षेस एकूण १, ९१, ५६३ उमेदवारांना प्रवेश देण्यात आला होता. पूर्व परीक्षेच्या निकालाआधारे एकूण १५७५ उमेदवार मुख्य परीक्षा देण्याकरिता यशस्वी ठरले होते. मुख्य परीक्षा दिनांक २४, २५ व २६ सप्टेंबर, २०१६ या कालावधीत मुंबईसह औरंगाबाद, नागपूर व पुणे या चार जिल्हा केंद्रावर घेण्यात आली होती. सदर मुख्य परीक्षेच्या निकालाआधारे एकूण ४१८ उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात आले होते. सदर मुलाखती दिनांक १६ ते २४ जानेवारी, २०१७ या कालावधीत घेऊन अंतिम निकाल दिनांक १६ मार्च, २०१७ रोजी जाहीर करण्यात आला आहे.

४. सदर निकालाआधारे ३४ महिला उमेदवारांची व २ अपंग उमेदवारांची शिफारस शासनाकडे करण्यात आली आहे.

विजया पडते
उपसचिव (परीक्षा)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई

मुंबई
दिनांक : १६ मार्च, २०१७